# बजाज इलेक्ट्रीकल्सची नागपुरात ३५.६२ कोटींची विक्री

सभा वृत्तसेवा

नागपूर, १२ जानेवारी

ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या तसेच प्रकाशमय उत्पादनांच्या निर्मितीतील अग्रणी बजाज इलेक्ट्रीकल्स लि. ने नागपूर विभागात ३५.६२ कोटी रुपयांचा व्यवसाय केला असल्याची



माहिती एका पत्रपरिषदेत पी. एस. टंडन यांनी दिली. कंपनीच्या विक्रीत १८ टक्के वाढ झाली असून वार्षिक आधारावर ही वाढ ११ टक्के आहे. कंपनीने बिझनेस टू कंझुमर या क्षेत्रात एलईडी लाईटसारखे अत्याधुनिक व बहुउपयोगी उत्पादन बाजारात आणले असून त्यातून ग्राहकांना एक अत्याधुनिक व बहुउपयोगी उत्पादन मिळणार आहे. बजाज कंपनीतर्फे नागपूर-बैतुल राष्ट्रीय राजमार्ग योजना, एनटीपीसी मौदा योजना, हायमास्ट स्ट्रीट लाईटचा ऑर्डर, वरोरा-बल्लारशा राजमार्ग परियोजना, ऑक्टोगोनल पोल, झिरो माईलवर हायमास्टची स्थापना, महानगरपालिकांसाठी हायमास्टची स्थापना, नागपूर रेल्वे स्थानकावर सीआय पोल्स आदी कामे करण्यात येत आहेत. यासोबतच कंपनीला कस्तुरबा गांधी मेडिकल कॉलेज अदाणी पॉवर, तिरोडा एमएनसी उमरेड, धुळे व विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर आदी कंपन्यांचे कार्यादेश देखील प्राप्त झाले आहेत. देशातील विविध क्षेत्रात बजाज इलेक्ट्रकल्सच्या १९ शाखा कार्यरत आहेत. त्यासाठी २२०० वितरक, ४१०० अधिकृत डीलर, लायटींगसाठी ४ लाख रिटेल आऊटलेट, अप्लायन्सेस ४० हजार तर पंख्यासाठी ५० हजार रिटेल आऊटलेट व २५० कस्टमर केअर सेंटर अशी भव्य मालिका कार्यरत आहे. यावेळी अमित सहानी उपस्थित होते. ■